महाराष्ट्र शासन

पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
गु.शा., मुंबई यांचे कार्यालय,
पोलीस आयुक्त कार्यालयीन आवार
(नवीन इमारत), चौथा मजला,
महात्मा फुले मंडई समोर, डॉ. दा.नौ.
मार्ग, मुंबई - ४०० ००१.

थेट दूरध्वनी :- +९१-२२-२२६२ १२२०
ई-मेल :— cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

---

# प्रेसनोट

**कक्ष -३, गु.प्र.शा., गु.अ.वि., ना. म. जोशी मार्ग, मुंबई.** **दिनांक - २९/०७/२०२२**

## फसवणुकीचा गुन्हा उघडकीस आणलेबाबत.

| | |
|---|---|
| कक्ष | गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., कक्ष -३, मुंबई. |
| पोलीस ठाणे | भायखळा पोलीस ठाणे, मुंबई |
| गुन्हा नोंद क्र. व कलम | ५७/२०२२ कलम ४२०, ३४ भादवि |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | ११/०६/२०२२ रोजी १४.०० वाजता |
| गुन्हा घडला दिनांक, वेळ व ठिकाण | सप्टेंबर - २०१९ पासून दिनांक ११/०६/२०२२ रोजी दरम्यान |
| फिर्यादी नाव | श्रीमती शाईन सरतारीयो जरीवाला वय-६२ वर्षे,धंदा-जॉब एजन्सी चालक, रा.ठि. फ्लॅट क्रमांक २, बुशेरी बिल्डींग क्रमांक ३, जेल रोड, उत्तर क्रॉस लेन, तळमजला, डोंगरी, मुंबई. |
| ताब्यात घेतलेल्या आरोपीची संख्या | ३ पुरुष इसम |

यातील फिर्यादी श्रीमती शाहीन जरीवाला हया जॉब रिक्रुटमेंटचे काम करतात. यातील अटक आरोपीतांनी त्यांचे उमेदवार बाहेर देशात पाठवितो असे सांगून फिर्यादी व त्यांच्या एकूण २२ उमेदवारांकडून वेळो वेळी रोखीने व ऑनलाईन २०, ५७,०००/- रु. घेवून त्यांच्या उमेदवारांना परदेशात कामास न पाठविता त्यांची फसवणुक केलेबाबत दिलेल्या तक्रारीवरुन वरुन प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी हे स्वत:चे अस्तितव लपवुन वेग वेगळया ठिकाणी राहवयास होते. आरोपी वापरत असलेले मोबाईल क्रमांक प्राप्त करून तांत्रीक व मानवी कौशल्याने तपास केला असता, सदरचे आरोपी हे वाशी, नवी मुंबई या ठिकाणी असल्याचे समजून आल्याने पोलीस पथक वाशी, नवी मुंबई याठिकाणी पाठविण्यात आले होते. सदर पथकाने दिनांक २६/०७/२०२२ रोजी तीनही आरोपीतांना वाशी, नवी मुंबई या ठिकाणावरुन ताब्यात घेवून कक्ष कार्यालयात आणले. कक्ष कार्यालयात त्यांच्याकडे गुन्हयाबाबत तपास केला असता, त्यांचा गुन्हयातील सहभाग स्पष्ट झाल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आले आहे.

सदरचा गुन्हा मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. सुहास वारके सो, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. विरेश प्रभु सो, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. बाळसिंग राजपुत सो व मा. स.पो.आ. (मध्य) नामदेव शिंदे सो यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष -३ चे प्रभारी पोलीस निरीक्षक सोपान काकड, स.पो.नि. समीर मुजावर, पो.उ.नि. आरीफ पटेल, पो.ना. आकाश मांगले, पो.ना. राहुल अनभुले, पो.ना. भास्कर गायकवाड व पो. शि.चा. अनिकेत मोरे या पथकाने उघडकीस आणला आहे.

--------------